# वैद्यकिय अधिकारी

## या पदावर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी MBBS/BAMS म्हणून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती बाबत.आरोग्य विभाग जि.प बीड

## जाहिरात क्र.१ /२०२०

बीड जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्र मध्ये कंत्राटी वैद्यकिय अधिकरी यांची जिल्हा आरोग्य अधिकारी ,जिल्हा परिषद, बीड यांचे अधिनस्त असलेल्या संस्थेतील रिक्त पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात ३ महिन्या च्या कालावधी भरावयाची आहेत. त्या करीता जिल्हाआरोग्यअधिकारी जिल्हापरिषद बीड येथे अर्ज करावेत. सद्या कोवीड-१९ विषाणु प्रार्दुभाव असल्यामूळे तृतीय वर्षाचे एकूण व अनुभव यावरुन जेष्ठता तयार करुन त्याप्रमाणे नियुक्तीसाठी पात्र/ अपात्र यादी तयार करण्यात येईल.

दि. १७/१०/२०२० रोजीसायंकाळी ६:१५वाजेपर्यंत इच्छुकउमेदवारांनी विहित नमुन्यात कागदपत्रासह जिल्हाआरोग्य अधिकारी जि.प. बीड कार्यालयात प्रत्यक्षसदर करावा पुरेशा प्रमाणात उमेदवार प्राप्त न झाल्यास किवा भविष्यात गरज पडल्यास प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्यावव चवथ्या सोमवारी walk in interview द्वारे उमेदवारांना रिक्त पदी नियुक्ती देण्यात येईल

इच्छुक उमेदवारांनी आपले सर्व शैक्षणीक अर्हता प्रमाणपत्र एमबीबीएस / बी ए एम एस यांचे सर्व वर्षाचे गुणपत्रक, पदवी/ पदवीका प्रमाणपत्र, वयाचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल नोंदणी प्रमाणपत्र आणि अली कडील पासपोर्ट साईजचा फोटो व इतर आवश्यक सर्व मुळ कादपत्र व साक्षांकीत छायांकीत प्रतीचा एक संच नोंदणी विभागामध्ये जमा करण्यात यावा. नंतर अर्जाची छाननी करण्यात येवून जेष्ठता यादी तयार करण्यात येईल. तसेच उमेदवाराचे वय ५८ वर्षा पेक्षा जास्त नसावे. १००रु बाँडवर सोबतच्या अटी व शर्तीचे बंधपत्र सादर करणे बंधनकारक राहील. बीड जिल्हया आंतर्गत प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र २ पदे उपलब्धआहेत आहेत. सदर पद भरतीतील पदे कमी अथवा जास्त होण्याची शक्यता आहे.

अ. एम.बी.बी.एस. अर्हता मासीक मानधन रु.७५०००/-

आ. बी ए एम एस अर्हता मासीक मानधन रु २८.०००/-

सदर जाहिरात ही beed.nic.in व https://zpbeed.gov.in संकेतस्थळावर असून अर्ज करण्यासाठी अर्ज नमुना व शेक्षणिक अर्हता तसेच यासाठीच्या अटी व शर्ती ची पुर्तता बाबतची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

स्वाक्षरीत/-<br>सदस्य-सचिव,<br>जिल्हा निवड समिती, तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.बीड

स्वाक्षरीत/-<br>अध्यक्ष,<br>जिल्हा निवड समिती, तथा<br>जिल्हाधिकारी, बीड.

Scanned by CamScanner

## वैद्यकिय अधिकारी

### या पदावर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी MBBS/BAMS म्हणून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती बाबत.आरोग्य विभाग जि.प बीड

### अर्जदाराचा विनंती अर्ज.

अर्जदाराचे संपुर्ण नाव :- ..........................................................................................

..........................................................................................

अर्जदाराचा पत्ता :- ..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

शैक्षणीक अर्हता :- ..........................................................................................

बंधपत्रीत / अंबधपत्रीत :- ..........................................................................................

शासकीय महाविद्यालय :- ..........................................................................................

वैद्यकिय नोंदणी प्रमाणपत्र :- ..........................................................................................

जात / जात वैद्यता प्रमाणपत्र:- ..........................................................................................

जन्म दिनांक :- ..........................................................................................

आधार कार्ड क्रमांक :- ..........................................................................................

भ्रमणधन्वी क्रमांक :- ..........................................................................................

ईमेल क्रमंक :- ..........................................................................................

| अ.क्र. | शाळा महाविद्यालयाचे नाव | शैक्षणीक अर्हता | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | | एस. एस. सी. | | | | |
| ०२ | | एमबीबीएस /बीएएमएस प्रथम | | | | |
| ०३ | | एमबीबीएस /बीएएमएस द्वितीय | | | | |
| ०४ | | एमबीबीएस/बीएएमएस तृतीय | | | | |
| ०५ | | पदवीका पदवी अंतीम | | | | |
| ०६ | | इतर शैक्षणीक अर्हता | | | | |

अनुभव —

| अ.क्र. | संस्थेचे नाव | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

अर्जदाराची नाव स्वाक्षरी /-

<u>अर्जा सोबत :-</u> मध्यमीक शालांत प्रमाणपत्र, सर्व मार्क मेमो प्रथम/ द्वितीय/ तृतीय, आंतरवासीता प्रमाणपत्र, पदवीका प्रमाणपत्र, पदवीका/पदवी मार्क मेमो, प्रमाणपत्र, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल नोंदणी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, जातवैद्यता प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, अनुषंगीक सर्व प्रमाणपत्र.

Scanned by CamScanner

# अटी व शर्ती

१. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकरी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना नियमीत वैद्यकिय अधिका-यांसारखे महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन , महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम, नियम लागू राहणार नाहीत. तसेच ते विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतेही सेवाविषयक इतर लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.

२. सदर वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती ०३ महिन्यासाठी किंवा सदर पदावर एमबीबीएस अर्हताधारक नियमीत वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होईल त्यादिनांका पर्यंत या पैकी जे अगोदर घडेल तो पर्यंतच असल्याने त्यांना वार्षीक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही.

३. सदर कंत्राटी नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना सदर पदावर कायम करण्यात येणार नाही व त्यापदावर त्यांचा धारणाधिकार असणार नाही.

४. केवळ तात्पुरती नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची भविष्यात विहीत मार्गाने नियमीत पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पुरती सेवा त्यांच्या नियमीत सेवेस जोडून दिली जाणार नाही.

५. केवळ तात्पुरती व कंत्राटी नियुक्ती दिलेल्या उमेदवरांची (निवृत्ती वेतन) महाराष्ट्र नागरी सेव नियम १९८२ मधील नुसार अर्हताकारी सेवा म्हणुन गणण्यात येणार नाही किंवा नियम ३० सेवा जेष्ठता व अन्य कोणत्याही प्रकारच्या सेवाविषयक बाबीसाठी ग्राहय धरली जाणार नाही.

६. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांनी सेवेत असताना गैरवर्तन / गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील व त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यात येणार नाही.

७. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिका-यांना महाराष्ट्र नगारी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील तरतुदी लागु होतील.

८. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांना सेवा काळात सेवामुक्त व्हायचे असल्यास त्यांना एक महिन्याची नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन भरुन कार्यमुक्त होता येईल.

९. कंत्राटी वैद्यकिय अधिका-यांची सेवा खालील कराणास्तव समाधान कारक नसल्यास कोणत्याही क्षणी त्यांची कंत्राटी सेवा पुर्व सुचना न देता समाप्त करण्यात येतील.

अ) दोन दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी विनापरवानगी गैरहजर .

ब) कामामध्ये निष्काळजीपणा.

क) बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी न लावणे.

ड) कामकाज अकार्याक्षम असणे / सेवेची कर्तव्ये व जबाबदा-या कटाक्षाने न पाळल्यास.

इ) गरवर्तन / गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास येणे.

ई) कार्यरत पदावर नियमीत वैद्यकिय अधिका-याची नियुक्ती झाल्यास.

१०. निवड झालेले वैद्यकिय अधिका-यांनी मुख्यालयी रहाणे बंधनकारक असेल तसेच बायोमेट्रीक हजेरी प्रणालीवर हजेरी लावणे अनिवार्य राहील.

११. वैद्यकिय अधिका-यांकडून त्यांची नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असलयामुळे सदर पदावर कायम करण्या बाबत भविघ्यात अधिकार सांगणार नाही व त्यासाठी तसेच इतर अन्य मागण्यासाठी अंदोलन / संप / बंद इत्यादी करणार नाही व त्यात भाग घेणार नाही अशा आशयाचे बंधपत्र १००/- रुपयांच्या स्टँम्प पेपरवर घेण्यात यावे.

१२. या सेवा कंत्राटी पध्दतीच्या असल्याने त्या बाबत कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

वरील अटी व शती हया मी स्वखुशीने लिहून देत आहे. त्या मला मान्य आहेत.

उमेदवार स्वाक्षरी/-

डॉ. ......................................

मो.क्र. ..................................

संपुर्ण पत्ता ...........................

Scanned by CamScanner